असा. क्र. ९६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, नोव्हेंबर १८, २००५/कार्तिक २७, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑक्टोबर २००५

**अधिसूचना**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक आरटीआय. २००५/सी.आर. ३१५/०५/५.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**— (१) या नियमांना महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ असे म्हणावे. (२) ते, दिनांक १२ ऑक्टोबर २००५ रोजी अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२), असा आहे ;

(ख) " कलम " याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(ग) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील ;

३. **माहिती मिळविण्याची कार्यपद्धती.**—कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा विनंती अर्ज, संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र (अ) मध्ये दिलेल्या नमुन्यात करण्यात येईल, आणि त्यासोबत सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये दहा इतकी अर्ज फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेच्या धनादेशाद्वारे जोडण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

४. **माहितीबद्दलची फी.**—(१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरूपात पुढील दरांनी आकारण्यात येईल :—

| | |
|---|---|
| (अ) (क) संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबतीत, | अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च. |
| (ख) माहिती छायांकित प्रतींच्या स्वरूपात किंवा अन्य (प्रतींच्या) स्वरूपात चटकन मिळण्याजोगी असेल त्याबाबतीत. | (एक) तयार केलेल्या किंवा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी (ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) दोन रुपये अधिक टपाल खर्च, किंवा<br>(दोन) मोठ्या आकारातील कागदाच्या प्रतीची प्रत्यक्ष आकार किंवा परिव्यय किंमत अधिक टपाल खर्च. |

(ब) अभिलेख पाहण्यासाठी, पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही, आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) रुपये पाच इतकी फी :

परंतु, अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल. त्याबाबतीत कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

(२) कलम ७ च्या पोट-कलम (५) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरूपात पुढील दरांनी आकारण्यात येईल :—

(क) डिस्केटस् किंवा फ्लॉपी या स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केटस् किंवा फ्लॉपीकरिता पन्नास रुपये अधिक टपाल खर्च ; आणि

(ख) मुद्रित स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी, अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा त्या प्रकाशनातील उताऱ्यांच्या प्रत्येक छायांकित पृष्टासाठी दोन रुपये अधिक टपाल खर्च :

परंतु अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल त्याबाबतीत, कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

५. **अपील.**—(१) कलम ७ च्या पोट-कलम (१), किंवा पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत निर्णय मिळाला नसेल अशा किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या, कोणत्याही व्यक्तीस, राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र " ब " मध्ये दिलेल्या नमुन्यात अपील दाखल करता येईल. अशा अपिलासोबत, ज्या विरुद्ध अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

(२) कलम १९ च्या पोट-कलम (१) खालील अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या अपील प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे साध्या कागदावर जोडपत्र " क " मध्ये दिलेल्या नमुन्यात दुसरे अपील दाखल करता येईल. अशा अपीलासोबत, ज्या विरूद्ध अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह, राज्य माहिती आयोगाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.